# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## यशवंत नाट्यमंदिर

आपल्या यशवंत नाट्यमंदिरास चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत असून नाट्यगृहात होणाऱ्या कार्यक्रमात उत्तरोत्तर वाढ होत आहे. वर्षभरात नाट्यगृहात एकूण सहाशे तेहतीस कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यात मराठी नाटके, इतर भाषिक कार्यक्रम, शुटींग, सभा, संगीताचे कार्यक्रम यांचा समावेश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने अनेक नामवंत व प्रसिध्द व्यक्तींनी नाट्यगृहास भेट दिली आहे. आपले नाट्यगृह मराठी नाटकांना कमीत - कमी दरात उपलब्ध करून दिले जात असून प्रायोगिक रंगभूमी, बालरंगभूमी आणि हौशी रंगभूमीसाठी नाट्यगृहाच्या भाड्यात पन्नास टक्के सवलत देण्यात येते. नाट्यगृहात मराठी कार्यक्रमांप्रमाणे शुटींग, सभा, इतर भाषिक कार्यक्रम होतात. आपल्या नाट्यगृहास रसिकांचा चांगल्याप्रकारे प्रतिसाद मिळत आहे.

## ९३ वे नाट्य संमेलन २०१२
## (बारामती)

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या विद्यमाने बारामती येथे ९३ वे अखिल भारतीय भारतीय मराठी नाट्य संमेलन दि. २२ डिसेंबर, २०१२ रोजी कवि मोरोपंत नगरी म.ए.सो. हायस्कुल मैदान, भिगवण रोड, बारामती येथे आयोजित करण्यात आले होते. सदर संमेलनात नाट्य परिषदेच्या विश्वस्त समितीचे अध्यक्ष, मा.ना.श्री. शरद पवारसाहेब यांच्या वाढदिवसापासून म्हणजे दिनांक १२/१२/२०१२ पासून विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. त्यामध्ये शोभायात्रा, एकांकिका महोत्सव, भारूड, नाट्यसंगीत, एकपात्री नाटक, दिर्घांक, संगीत नाटक, कवाली, नाट्य कार्यशाळा, जादूचे प्रयोग, एकपात्री, बालनाट्य, दशावतारी, प्रदर्शन, हिंदी नाटक इत्यादी कार्यक्रमांचा समावेश होता.

## शनिवार, दि. २२ डिसेंबर, २०१२

शनिवार, दिनांक २२ डिसेंबर २०१२ रोजी सकाळी १०.०० पर्यंत नाट्यज्योत आगमन. पथनाट्य.
सकाळी १० ते १ पर्यंत मोरोपंत नगरीत उद्‌घाटन समारंभ पार पडला. स्वागताध्यक्ष उपमुख्यमंत्री. महाराष्ट्र राज्य श्री. अजितदादा पवार यांनी निमंत्रितांचे स्वागत केले. उद्‌घाटक होते केंद्रिय कृषीमंत्री, मा. ना. श्री. शरदचंद्र पवारसाहेब, संमेलनाध्यक्ष श्री. श्रीकांत मोघे आणि नियोजित संमेलनाध्यक्ष डॉ. मोहन आगाशे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा उद्‌घाटन सोहळा पार पडला.
सायं. ४ ते ६ या वेळेत मराठी संगीत रजनी हा कार्यक्रम पार पडला आणि रात्रौ ७ ते १० या वेळेत मराठी तारका हा सर्व आघाडीच्या मराठी अभिनेत्रींचा सहभाग असलेला कार्यक्रम सादर करण्यात आला.
दुपारी २ ते ४ यावेळेत म. ए. सो. सभागृह येथे 'मराठी नाटकांतील स्त्रीयांचे स्थान' हा परिसंवाद घेण्यात आला. त्याचवेळी नटराज नाट्यमंदिर येथे एकांकिका महोत्सव सादर करण्यात आला. खुल्या रंगमंचावर ३ ते ४ यावेळेत एकपात्री महोत्सव सादर करण्यात आला.

## रविवार, दि. २३ डिसेंबर, २०१२

रविवार दि. २३ डिसेंबर २०१२ रोजी सकाळी ९ ते ११ यावेळेत म.ए.सो. सभागृह येथे विषय नियामक मंडळाची सभा घेण्यात आली. स. ११.०० वा. बालविकास मंदिर येथे नियोजित व मावळते संमेलनाध्यक्ष यांची श्री. सुधीर गाडगीळ यांनी प्रकट मुलाखत घेतली. याचवेळी नटराज नाट्यमंदिर येथे बालनाट्य घेण्यात आले. तसेच म.ए.सो. सभागृह येथे 'मराठी रंगभूमी नव्या नाटकाच्या शोधात' या विषयावर परिसंवाद घेण्यात आला. खुल्या रंगमंचावर एकपात्री महोत्सव दु. ११. ते २ पर्यंत होता. दुपारी २.०० वा. म.ए.सो. सभागृहात 'जुन्या नाटकांची निर्मिती यशाची खात्री की अपयशाच्या भितीतून सुटका' हा परिसंवाद सादर करण्यात आला. दुपारी ४ ते ६ यावेळेत मोरोपंत नगरीत समारोप व खुले अधिवेशन पार पडले. सायं. ७ ते १० या वेळत 'शंभुराजे' हे व्यावसायिक नाटक सादर करण्यात आले.